आर बी आय / २००४-०५ /४६८
संदर्भ क्र. सीओ. डीटी. १५.०२.००१/एच-९५९३-९६१५/२००४-०५

मे १४, २००५
चैत्र २३, १९२७ (श)

महाव्यवस्थापक
शासकीय लेखा विभाग
स्टेट बँक ऑफ इंडिया/अलाहाबाद बँक /बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/ कॅनरा बँक/ सेंट्रल बँक ऑफ इंडिया/कार्पोरेशन बँक/देना बँक / इंडियन बँक/इंडियन ओव्हर्सिज बँक/पंजाब नॅशनल बँक /सिंडिकेट बँक/युको बँक / युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया

प्रिय महोदय,

**सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८- सुधारणा**

आम्ही यासोबत वित्तमंत्रालय भारत सरकार दिल्ली द्वारा दिलेल्या परिपत्रक क्र. जी एस आर - (ई) दिनांक मे १३, २००५ ची सार्वजनिक भविष्यनिधी योजना १९६८ मधील तरतुदींमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा केलेली एक प्रत पाठवित आहोतः-

१. परिच्छेद ३ चा उप-परिच्छेद (२) गाळला जाईल.
२. परिच्छेद १२ च्या उप-परिच्छेद (१) मधील सूचना ( नोट ) गाळली जाईल.
३. फॉर्म ए मध्ये -

अ) “ अकाउंट इन दि नेम ऑफ सेल्फ/ मायनर (स) / एच यु एफ / असोसिएशन” या शीर्षका ऐवजी “ अकाउंट इन दि नेम ऑफ सेल्फ/ मायनर (स)” हे शीर्षक येईल.

ब) परिच्छेद (ii) मधील ‘ऑर ए हिंदु अनडिव्हायडेड फॅमिली ऑर ऍन असोसिएशन ऑफ पर्सन्स ’ हे शब्द गळले जातील.

क) परिच्छेद (iii) मधील डिटेल्स मधील अनुक्रमांक ३ आणि ४, त्यांच्या संबंधीच्या एंट्रीज सकट गाळले जातील.

ड) परिच्छेद (iv) च्या उपपरिच्छेद (बी) व (सी) गाळले जातील

ई) “सूचना (नोट) १” गाळली जाईल.

२. पीपीएफ स्कीम, १९६८ मधील या सुधारणा मे १३, २००५ पासून जारी करण्यात आल्या आहेत. आपण पीपीएफ योजना, १९६८ कार्यान्वित करणाऱ्या, आपल्या सर्व नियोजित शाखांना/ कार्यालयांना कृपया योग्य सूचना द्याव्यात. पीपीएफ खातेदारांसाठी या सुधारणा वरील शाखांनी नोटीस बोर्डवर प्रदर्शित कराव्यात.

३. कृपया पोच द्यावी

आपला विश्वासू
( डी राजगोपाल राव)
उपमहाव्यवस्थापक